R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १०८

दि.०९ एप्रिल २०२६,वार: गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

E-mail : dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## लातूर जिल्ह्यात ८ ते १४ एप्रिल दरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह

लातूर, :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त लातूर जिल्ह्यात ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचा प्रसार आणि महामानवांच्या विचारांचा जागर केला जाईल, अशी माहिती समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार आणि सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे उद्घाटन ८ एप्रिल रोजी करण्यात आले. तसेच सर्व तालुक्यांच्या गटविकास अधिकाऱ्यांमार्फत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्याची कार्यवाही आजपासून सुरु झाली आहे. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष असल्याने ९ एप्रिल रोजी लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालय, आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह, निवासी शाळा येथे मानवी हक्कांवर आधारित व्याख्याने, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. १० एप्रिल रोजी समतादूतांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात पथनाट्यांद्वारे शासकीय योजनांविषयी जनजागृती केली जाईल.

तसेच 'मार्जिन मनी' योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सहायक आयुक्त श्री. गायकवाड यांनी सांगितले.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे हे द्विशताब्दी वर्ष असल्याने त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रमांचे शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांमध्ये ११ एप्रिल रोजी आयोजन करण्यात येईल. १२ एप्रिल रोजी 'संविधान जागर' अंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्यांविषयी विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. तसेच महिला मेळाव्याच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याचा माहिती दिली जयाल. १३ एप्रिल रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबीर व मेळावा आयोजित करण्यात येईल. तसेच जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे श्री. गायकवाड म्हणाले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी अभिवादन कार्यक्रम, चर्चासत्रे आणि कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा आयोजित करून शेतकऱ्यांसाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्याची माहिती दिली जाईल. या सप्ताहादरम्यान विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिक, विद्यार्थी आणि लाभार्थ्यांनी या विविध उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार आणि सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले.

## सौ. सुजाता पाटील (महापौर) नवी मुंबई यांची सदिच्छा भेट बुद्ध जयंती पूर्वी ज्वेल्स- लॉर्ड बुद्धा पार्कचे सुशोभीकरण करा..!

नवी मुंबई / के. एच. हनवते :-ज्वेल्स - लॉर्ड बुद्धा पार्क नेरूळ नवी मुंबई येथील सुंदर अशा शांती वनात गेल्या वर्षी जुलै महिन्यात विश्वशांती दूथ तथागत भगवान गौत्तम बुद्धांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली त्याचा आम्हा सर्वांना अत्यानंद आहे पण तदनंतर काही कालांतराने सदर ठिकाणी २६ नोव्हेंबर हल्ल्यात शहीद झालेल्या हुतात्मा सैनिक स्मारक विषयक लावलेला बोर्ड या परिसराच्या मूळ उद्देशाशी सुसंगत नसून तो अन्यत्र हलवण्यात यावा, जेणेकरून या परिसराचे स्वतंत्र अस्तित्व अबाधित राहील. सदर ठिकाणी लावलेला बोर्ड लवकरात लवकर काढण्यात यावा, आणि ज्वेल्स- लॉर्ड बुद्धा पार्क येथे बुद्ध जयंती पूर्वी सर्व सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात व पार्कचे सुशोभीकरण लवकरात लवकर करण्यात यावे इत्यादी बाबत नवी मुंबई महानगरपालिका महापौर : सौ. सुजाता ताई पाटील यांना निवेदन देण्यात आले, सदर प्रसंगी महापौर यांनी आम्हाला आश्वासित केले की, लवकरच त्या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने या पार्कचे चांगल्या प्रकारे सुशोभीकरण करणार जेणेकरून सर्व नवी मुंबईकरांसाठी एक आकर्षण व प्रेरणादायी केंद्र कसे ठरेल या संदर्भात आम्ही पुढील कामकाज करणार आहोत..! त्यावेळी लॉर्ड बुद्धा कल्याण प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष : कल्याणराव हनवते (पत्रकार- बौद्धाचार्य) सह कोंडीबा हिंगोले (कामगार युनियन नेरूळ अध्यक्ष), गोविंद वेताळ (समाजसेवक), सुमेध हनवते इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.



## भातांगळी येथे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते २५ लक्ष रुपये खर्चाच्या सभामंडपाचे भूमिपूजन



लातूर - लातूर तालुक्यातील मौजे भातांगळी येथे अखंड हरिनाम सप्ताहातील श्रीमद भागवत कथा ज्ञान यज्ञाच्या समारोप निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरा समोर आमदार निधीतील २५ लक्ष रुपये खर्चाच्या सभा मंडप उभारणी कामाचे भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.



प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी लातूर तालुक्यातील मौजे भातांगळी येथे २ मार्च ते ९ मार्च दरम्यान विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात होत आहे. या सप्ताहात आळंदी येथील हभप श्री जनार्धनदास महाराज यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचा समारोप भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

याप्रसंगी भागवत कथाकार हभप श्री जनार्दन दास महाराज यांचा आ कराड यांनी यथोचित सत्कार करून सन्मान केला. विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर आमदार निधीतून २५ लक्ष रुपये खर्चाच्या सभा मंडप उभारणी कामाचा भूमिपूजन भाजप नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. आ. कराड यांचे भातागळी गावात आगमन होतात फटाक्याची आतिषबाजी करून ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले. भातांगळीचे उपसरपंच मारुती शिंदे यांच्या संपर्क कार्यालयास आ. रमेशअप्पा कराड यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, विजयकुमार मलवाडे, पांडुरंग बालवाड, व्यंकटसिंह चव्हाण, आदिनाथ मुळे, नागनाथ ऊटेकर, व्यंकट जटाळ, सुरेखा पुरी, चंद्रकांत पासमे पद्माकर शिंदे, लिंबराज बोळगे, बाबासाहेब इंगळे, केदार ठाकूर, किरण पुरी, सोमनाथ गोकुळे, संतोष पाटील, बापूराव पाटील, आनंत पाटील, महादेव मुचाटे, अहमद शेख, गौरीशंकर गिरवलकर, रावसाहेब पाटील, दिलीप कांबळे, विष्णू कारवाडे, दिलीप मुक्ता यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते भाविक भक्त महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्ही एस पँथर्स वाहतूक शाखेने गोलाई तील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी दिले वाहतूक पोलीस निरीक्षकाना निवेदन

लातूर : व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देऊन गंजगोलाई परिसरात अवजड वाहने तसेच इतर मोठी वाहने बेकायदेशीर पार्किंग होत असल्यामुळे ऑटो चालक इतर वाहन चालक व नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत आहे याकडे वाहतूक शाखेचे दुर्लक्ष होत असल्याचे जाणवत आहे. यामुळे गंजगोलाई परिसरातील व्यापारी मुजोरपणे मोठी वाहने रोडवर लावून वाहतूक कोंडी निर्माण करत आहेत याकडे गंभीरतेने लक्ष देऊन तात्काळ ही समस्या सोडविण्यात यावी अन्यथा व्ही एस पँथर्स वाहतूक आघाडी तीव्र आंदोलन छेडेल याची गंभीरतेने दखल घेण्यात यावी. या निवेदनावर संघटनेचे संपर्कप्रमुख आनंद जाधव वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार शहर संघटक गणेश कसबे शहर सचिव आर्यन पठाण आलफेज शेख तौसीब सौदागर शहर कार्याध्यक्ष गौस शेख आदींच्या स्वाक्षरी आहेत



## संपादकीय...

### इराणचा विजय;डोनाल्ड ट्रम्पची मग्रुरी उध्वस्त होऊन इराणपुढे शरणागती.

दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ ला डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण सोबत युध्दाला सुरुवात करून मानवी क्रूरता दाखविली आणि आज ४० दिवसांनंतर मोठमोठी धमकी देणारे डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचा कट्टर दुश्मण समजला जाणाऱ्या चीनच्या माध्यमातून इराणला शरण आल्याचे दिसून येते.युध्दविराम १४ दिवसांसाठी का होईना झाले याचे मनापासून स्वागत यामुळे शांती प्रस्थापित करण्यासाठी मोठी मदत होईल.कारण युद्धामुळे कोणाचेच हित साध्य झाले नाही आणि होणार नाही.अमेरिकेला गैरसमज होता की,इराणवर लवकरात लवकर विजय प्राप्त होईल.परंतु या युध्दाला आज ४० दिवसांचा काळ लोटला यात अमेरिकेचे अरबोखरबो डॉलर स्वाहा झाले.सोबतच मिडलिस्ट मधील ज्या-ज्या ठिकाणी अमेरिकन लष्करी तळ आहे अशा पश्चिम आशियात (मध्य पूर्व) अमेरिकेचे अनेक लष्करी तळ आहेत, ज्यात कतार, बहरीन, कुवेत, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती(युएई), जॉर्डन, ओमान,इराक, दुबई आणि सीरिया या देशांची मानवीय व वित्तीय हाणी मोठ्या प्रमाणात झाली असून आजही नागरिक भयभीत आहेत आणि आज हे संपूर्ण देश ५० वर्षे मागे ढकलल्या गेले याचे मुख्य कारण म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेले बेकायदेशीर युद्ध.या मुद्द्यावरून स्पष्ट होते की, अमेरिका स्वार्था व लालची देश आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या चुकीच्या निर्णयामुळे ट्रम्प जगाचा क्रूर हत्यारा झाल्याचे सिद्ध झाले आहे.कारण एवढे पाप हिटलरने सुध्दा केले नसावेत त्यापेक्षा हजार पटीने पाप डोनाल्ड ट्रम्प यांनी केले आहे आणि याचे प्रायश्चित्त जगापुढे शरणागती पत्करून भोगावे लागत आहे.आज नाटो, युरोपीय देश, ब्रिटन, फ्रान्स,अमेरिकन नागरिक,अमेरिकेचे मित्र देश डोनाल्ड ट्रम्प यांच्या चुकीच्या निर्णयाचा धिक्कार करीत आहे व डोनाल्ड ट्रम्प मानवतेचा व विश्व शांतिचा हत्यारा समजत आहे.अमेरिकेने नेहमीच अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पळ काढला ही बाब सर्वांनाच ग्यात आहे आणि त्याचीच पुनरावृत्ती पश्चिम आशियातील ( मिडलिस्ट)देशांची करून ठेवली आहे. त्याचप्रमाणे डोनाल्ड ट्रम्प आपली करारी हार लक्षात घेता,मिडलिस्टला रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पसार होण्याच्या मार्गावर आहेत. इराणवर आक्रमक करून ताबडतोब होर्मुझ व खार्ग बेटावर कब्जा करून तेल कंपन्यांनवर आपले नियंत्रण ठेवु अशी धारणा डोनाल्ड ट्रम्प यांची होती परंतु त्याची संपूर्ण चाल फसली.सुपर पॉवर समजणारा डोनाल्ड ट्रम्प आज इराण व चीनच्या पायावर लोटांगण घालत असुन लाचारी पत्करल्याचे दिसून येते.आज ट्रम्पची संपूर्ण हेकडी चुरचुर झाली आहे.या दोन आठवड्यांच्या( १४ दिवसांच्या )युद्ध विराममध्ये इराणने आपल्या १० अटी अमेरिकेसमोर ठेवल्या आहेत तर अमेरिकेने आपल्या १५ अटी इराण समोर ठेवल्या आहेत.युध्दविराम जगासाठी आनंदाची गोष्ट म्हणजे होर्मुझ सामुद्रधुनी ताबडतोब खोलण्यात आले आहे.कारण होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्याने अनेक देशांचे हजारो जहाज समुद्रात वेगवेगळ्या ठिकाणी थांबले आहेत.परंतु युध्दविराममुळे जगातील २० ते २५ टक्के तेल वाहून नेणारे शेकडो जहाजांचे आवागमन सुरू झाले आहे.या संपूर्ण घटनाक्रमावरून स्पष्ट होते की ट्रम्पनी आपली हार स्विकार केली असून शरणागती पत्करली आहे.

होर्मुझ सामुद्रधुनी वरून जाणाऱ्या जहाजांकडुन इराणने टोल टॅक्स वसुलण्याची अट ठेवली आहे.अमेरिकेने इराणला एवढ्या जखमा दिल्या आहेत की,इराण कधीही विसरणार नाही आणि या जखमा जगाने आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहील्या आहे. अमेरिका-इस्रायलने एवढ्या जखमा देऊन व उच्च पदस्थ नेते व टॉप कमांडर मारल्या जाऊनही इराण ताट मानाने उभे राहून अमेरिका-इस्रायलला जशास तशी टक्कर दिली आणि ही टक्कर जगाने आपल्या उघड्या डोळ्यांनी पहाली व ही लढाई जिंकून दाखवली.या युध्दावरून स्पष्ट होते की,ज्याचे युद्ध त्यालाच लढावे लागेल कोणीही कोणाला मदत करणार नाही. अमेरिका कितीही बलाढ्य असला व सुपर पॉवर असला तरी त्याला आज छोट्याशा इराण समोर झुकावे लागले.म्हणुन या अत्याधुनिक युगात कोणत्याही देशांनी मुजोरी करू नये मुजोरी केली डोनाल्ड ट्रम्प सारखे हालबेहाल इतरांचे सुध्दा होऊ शकतात यालाही नाकारता येत नाही.या युद्धामुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था कोलमडली आहे सोबतच पश्चिम आशियातील मध्यपुर्व देश आज ५० वर्षे मागे गेले आहेत. कारण यात मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्तीय झाली आहे आणि ही हाणी व जखमा अनेक काळापर्यंत प्रत्येकांच्या ह्रदयात घर करून राहिल.या युद्धविराममध्ये लेबनॉनसह युक्रेनला सुध्दा सहभागी करून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने पुढाकार घेतला पाहिजे.कारण कोणतेही युद्ध असो त्यात आपल्याला फक्त विनाशच दिसून येईल.डोनाल्ड ट्रम्पची क्रूरता व लादलेले युद्ध तोडण्यासाठी इराणचे नागरिक,तरूण, कलावंत, खेळाडू, विद्यार्थी,प्राध्यापक यांनी अणुऊर्जा प्रकल्पाभोवती मानवी साखळी तयार करून डोनाल्ड ट्रम्प यांना शरणागती पत्करण्यास भाग पाडले.इराणवर अनेक परकीय आक्रमण झालीत यात मुख्यत्वे करून चंगेज खान आणि तैमूरलंग यांनी इराणवर आक्रमक करून मोठी हाणी पोहचवली तरीही इराण डगमगला नाही.यानंतर इराण- इराक युद्ध ८ वर्षे चालली यातही इराणचा विजय झाला.यावरून स्पष्ट होते की इराणची भौगोलिक परिस्थितीच इराणचे मुख्य व अभेद्य सुरक्षा कवच आहे. इराणच्या मानवतेला माझा सलाम.जय हिंद

# जागतिक आरोग्य दिन

यावर्षीचे घोषवाक्य आहे आरोग्यासाठी एकत्र. विज्ञानाच्या पाठीशी उभे रहा. असं म्हटलं जातं 'हेल्थ इस द ग्रेटेस्ट असेट ऑफ हुमन बीइंग'. आरोग्य हीच माणसाची सर्वात अमूल्य संपत्ती आहे मग हे चांगलं ठेवणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. सात एप्रिल हा जागतिक आरोग्य दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. खरंतर दररोजच आरोग्य दिन असायला हवा असे मी म्हणते मग त्यासाठी आपण आपली जीवनशैली निरोगी ठेवण्यास प्रयत्नशील असायला हवं. दरवर्षीय आरोग्यावर जागतिक आरोग्य संघटना एक घोषवाक्य निवडते आणि मग सगळ्या स्तरांवर त्याची अंमलबजावणी



होते. यावर्षीचे घोषवाक्य आहे आरोग्यासाठी एकत्र; विज्ञानाच्या पाठीशी उभे रहा. ही संकल्पना विशेषता आजकालच्या गैर माहितीच्या काळात जागतिक आरोग्य आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विज्ञानाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर देते. संशोधनावर आधारित धोरणे आणि अंतरराष्ट्रीय सांघिक कार्यावर लक्ष केंद्रित करून दर्जेदार आरोग्य सेवा प्रत्येकासाठी सर्वत्र सुलभ आणि सुखकर करणे हे या संकल्पनेचे उद्दिष्ट आहे. यावर्षीची थीम मानव, प्राणी, वनस्पती आणि पर्यावरणाच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी वैज्ञानिक सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करते.

**डॉ विमल डोळे**
**सहयोगी प्राध्यापक**
**विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर**

# पण घरच्यांची काळजी कोण घेणार?- शांताराम निकम

उल्हासनगर ३ येथील शांतीनगर स्मशानात स्थानिक नागरिकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा धोरण न राबवता अनधिकृत पुतळा लावला होता.त्यासाठी विविध संघटनांनी,नेत्यांनी आवाज उचलला, पत्रव्यवहार झाला पण प्रशासन ऐकत नव्हते,शेवटी कायदाने वागा चळवळीचे अध्यक्ष राज असरोंडकर यांनी आमरण उपोषण करून कायदेशीर मार्गानेच प्रशासनाला अनधिकृत पुतळा स्मशानातून स्थलांतर करण्यास भाग पाडले. खरं म्हणजे राज असरोंडकर यांनी जीवावर उदार होऊन हे आंदोलन छेडले होते.सतत सहा दिवस फक्त पाण्यावर राहून यांनी स्वतः च्या तबेतीची काळजी न करता हे आंदोलन यशस्वी करून दाखवले.या आंदोलनात त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे कार्यकर्ते तर होतेच,शिवाय विविध संघटना त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या.हा आधार असला तरी दिवसेंदिवस त्यांची तबेत खालावत चालली होती.नंतर नंतर तर डोळे लावले की लगेच त्यांना गाढ झोप लागत होती.ऍसिडिटी वाढली होती.म्हणजे शरीराने कुरबुर करायला सुरवात केली होती.त्यांच्या भेटीला विविध क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते,सामान्य नागरिक येत होते. त्यांना उभारी मिळत होती.ताकद वाढत होती. हे जरी खरे असले तरी घरात मात्र सतत धाकधूक सुरू होती.

राज असरोंडकर यांनी हे उपोषण घरातील बैठक खोलीत सुरू केले होते.घरात त्यांची साधारणपणे पंचाहत्तरी पार केलेली आई,२८ वर्षांचा मुलगा निनाद,२२ वर्षांची मुलगी सिमरन हे त्यांच्या रोजच्या घडामोडी बघत होते.घरातील कर्ता पुरुष काही कारणाने जर एकवेळचे जेवला नाही तर घरातील सर्वात संवेदशील असलेली आई घायकुतीला येते,मुलं हवालदिल होतात,पत्नी रडकुंडीला येते.भाऊ बहिणी अस्वस्थ होतात.इथे तर राज असरोंडकर हे आमरण उपोषणाला बसत होते. म्हणजेच ते उपोषण किती काळ घेईल सांगता येत नव्हते.अशावेळी घरातील परिस्थिती काय असेल,याचा कोणी विचार केला असेल काय? उपोषणाचे पहिले दोन दिवस खेळीमेळीत गेले पण तिसऱ्या दिवशी त्यांना त्रास जाणवू लागला.त्यामुळे अख्ख घर अस्वस्थ झालं. राज यांचं आंदोलन बैठक खोलीत सुरू होतं. आतल्या घरात सिमरन आणि आई असायच्या. निनाद मात्र राजच्या पाठीशी दिवसभर असायचा.कोणी आल्यागेल्याची सरबराई करत होता.फोटोग्राफी करून, व्हिडीओ काढून समाजमाध्यमांवर टाकून आंदोलन हलते ठेवत होता.पण आईची आणि सिमरणची घालमेल बघवत नव्हती.आई दिवसातून कितीतरी वेळा पडद्यामागून राजचे हाल बघून जायची.तिच्या चेहऱ्यावर पहिल्या दिवसापासून बिलकुल हसू नव्हते. सतत चेहरा चिंताग्रस्त पण आश्वासक होता.आपला कर्तबगार मुलगा विजय नक्की खेचून आणेल हा विश्वास होता.याला कितीही सांगितले तरी हा चिवट मुलगा आपली मागणी मान्य होईपर्यंत उपोषणाला आणखी चिटकून बसेल,कुठल्याही आमिषाला बळी न पडता उपोषण सोडणार नाही. हे या माउलीला माहीत होते.म्हणून तिने कुठलिही भावनिक साद घातली नाही.

पण कितीही असले तरी आई ती आईच असते.ती श्रीमंतांची असो की गरिबांची असो.प्रत्येक मुलावर आई सारखेच प्रेम करत असते. उपाशी राहून मुलांचे पोट भरत असते. पण इथे तर मुलगाच उपाशी रहाणार होता. त्या माउलीला जेवण कसे गोड जाणार होते. राज जरी सामाजिक आंदोलन म्हणून उपवास करत होते, फक्त पाणी पिऊन राहत होते तरी घरातील सगळेच जेवत असतील असे नाही.नक्कीच तेही अर्धपोटी राहत असतील.मुलगा उपाशी असताना आईला जेवण कसे गोड लागेल. आंदोलन घरात असल्यामुळे अनेक लोक सतत घरी येत होते म्हणून आईला व सिमरनला पुढे येऊन बसायला मिळत नव्हते.जरी आई आतल्या खोलीत असली तरी तिचे कान मात्र राज यांच्या जवळपास फिरकत असायचे.सिमरनसुद्धा पाण्याच्या बहाण्याने किंवा काहीही कारण काढून राज यांना बघून जायची.राज असरोंडकर सहा दिवस उपोषणाला बसले ही त्यांची हिम्मत तर आहेच पण घरातल्या सदस्यांचा मोठा त्याग आहे.एक माणूस उपोषणाला बसला आहे,इतकेच आपल्याला दिसते पण त्याचे घर पूर्ण विस्कळीत झाल्याचे दिसत नाही. दिवसाचे सर्व रुटीन बदलल्याचे दिसत नाही.

राज असरोंडकर यांना जेंव्हा ऍसिडिटीचा त्रास सुरू झाला,डोळ्यावर झापड यायला लागली तेंव्हा मात्र सर्वांच्या चेहऱ्यावर चिंतेचे सावट कायम दिसत होते. हसू तर कुठल्याकुठे पळून गेले होते.पहिल्या दोन दिवसात जी मस्तीमजाक सुरू होती तिनेही आता गंभीर रूप घेतले होते.तिसऱ्या दिवशी राज यांची आणि माझी चर्चा सुरू असताना राज खाटेवर पडून माझ्याशी बोलत होते,निनाद मी आणि राज इतकेच तिथे होतो.दुपारच्या वेळी कोणी नसतानाची संधी साधून सिमरन राज यांच्याजवळ आली आणि त्यांना चिपकली,रडली नाही इतकेच. पण तिच्या चेहऱ्यावरची काळजी स्पष्ट दिसत होती. डोळे कुठेतरी बघत स्थिर होते,ह्रदयातील घालमेल ती चेहऱ्यावर आणत नव्हती, मात्र प्रचंड अनामिक भीतीने ग्रस्त होती. निनाद मस्करी करायला बघत होता. बघितलं का काका,स्वतः पोटभर जेऊन घेतलं आणि आली पप्पांजवळ. पण ती बिलकुल मस्तीच्या मूडमध्ये नव्हती. तो असं बोलल्याने तिच्या डोळ्यात टचकन पाणी आलेले दिसले पण ते तिने जिरवले.निनाद तरी कुठे मनापासून बोलत होता, तोही तर अस्वस्थच होता.पुढे काय वाढून ठेवले आहे.याची चिंता दोघांनाही होती.बराच काळ ती राज यांच्या पोटाला घट्ट मिठी मारून होती.जणू काही पोट किती खपाटीला गेले आहे हेच पाहत होती. नजर स्थिर पत्र्यांकडे होती. राज तिच्या डोक्यावरून हात फिरवून, काहीतरी बोलून तिला वेगळ्या पद्धतीने समजावण्याचा प्रयत्न करत होते. पण तेही मुलीच्या मनातील घालमेल बघून अस्वस्थ झाले होते, त्यांचा चेहराही पडलेला .बाप लेकीचा मूक संवाद सुरू होता. हे भावनिक दृश्य पाहून मन गलबलून आलं.बाप लेकीचं प्रेम काय असतं ,हे त्याचं प्रतीक होतं. जगातल्या अपवाद वगळता सगळ्याच मुली बापावर जीव ओवाळून टाकत असतात,हे काही खोटे नाही.जसजसे दिवस वाढत गेले तसतसे कार्यकर्त्यांच्या तोंडावरचे हसू मावळत गेले.तसं पाहिलं तर थोडीफार हसीमजाक होत होती,पण ती वरूनवरून,आतून मात्र सर्वच चिंताग्रस्त होते.

चौथ्या दिवशीही काही हालचाल नव्हती. राज रोज काहीतरी लिहून समाजमाध्यमांवर टाकत होते.तसे सगळेच सामजिक जाणीव असलेले कार्यकर्ते समाजमाध्यम हलते ठेवत होते.विविध संघटनेचे कार्यकर्ते सतत भेटी देत होते.उपोषण १ तारखेला सुरू झाले होते.३,४,५ तारखेला सार्वजनिक सुट्टया होत्या.अधिकाऱ्यांनी तीन दिवसांचा प्लॅन करून पिकनिक वैगरे अरेंज केली असावी.त्यामुळे ते उपोषणाकडे फिरकणार नाहीत ,हे गृहीत होते.आणि झाले ही तसेच.राज यांनी समाजमाध्यमांवर सांगून टाकले की, 'सोमवारपर्यंत काही निकाल हाती लागला नाही तर हे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयावर होईल,' त्यामुळे तहसीलदार यांचा राज यांना फोन आला.त्यांनी एक दिवस देण्याची विनंती केली.राज यांनी ती दिली. सहा तारखेला म्हणजे उपोषणाच्या सहाव्या दिवशी मध्यवर्ती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ मनोहर बनसोडे राज यांना भेटायला आले त्यांनी राज यांची तपासणी केली,प्रकृती ढासळल्याचे सांगून लगेच औषधोपचार करावे लागतील असे सांगितले.हा निरोप समाजमाध्यमांवर फिरू लागला. त्याच्या परिणामाने चक्र फिरली.सर्व राजकीय पक्षांनी पुढाकार घेतला,ज्या नागरिकांनी पुतळा स्मशानात उभारला होता,त्या नागरिकांची समजूत काढण्यात किंवा तो पुतळा अनधिकृत असल्याने नागरिकांना काय नुकसान होऊ शकते,हे पटवल्यामुळे नागरिक पुतळा स्थलांतर करू देण्यास तयार झाले.पुतळा स्थलांतर करा आणि स्थलांतर करू देणार नाही ,या दोन बाजू होत्या त्यातील एक बाजूने माघार घेतली. दुपारी २ वाजून ५५ मिनिटांनी निरोप आला की,पुतळा स्मशानातून स्थलांतर करण्यात आला आहे.सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसला.अर्ध्या तासात राज असरोंडकर यांच्या घराच्या समोरच्या रस्त्यावर गाड्यांची रीघ लागली.तहसीलदार यांच्या हस्ते,महापौर,आमदार, स्थानिक पक्षांचे नेते, संघटनांचे कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत उपोषणाची सांगता करण्यात आली. राज यांच्या उपोषणाला यश आले. राज यांच्या सांगण्यावरून हे त्यांचे आजपर्यंतच्या सार्वजनिक जीवनातील ३० वे उपोषण होते.तसे पाहिले तर सर्वात जास्त वेळा उपोषण करण्याचा मान राज असरोंडकर यांना द्यायला हरकत नाही.

कारण महात्मा गांधींनी एकूण १७ वेळा उपोषण केले त्यांचे सर्वात लांब उपोषण २१ दिवसांचे होते. जतीनदास यांनी ६३ दिवस तुरुंगात कैद्यांना सुविधा मिळाव्यात म्हणून ऐतिहासिक उपोषण केले,त्यातच त्यांचा अंत झाला,अण्णा हजारे यांनी २० पेक्षा जास्त वेळा भ्रष्टाचाराच्या विरोधात उपोषण केले आहे.भगतसिंग यांनी ११६ दिवस तुरुंगात पुस्तके मिळावीत,लेखन साहित्य मिळावे, युरोपियन कैद्यांसारख्या सुविधा मिळाव्यात म्हणून उपोषण केले होते. तर सर्वात जास्त कालावधीसाठी माणिपूरच्या इरोम शर्मिला यांनी जगातील सर्वात लांब म्हणजे सलग सोळा वर्षे (२००० ते २०१६) ऋक्ष कायद्याच्या विरोधात उपोषण केले होते.त्यांना नाकाद्वारे द्रव आहार दिला जात असे.वरील सर्व उपोषणकर्त्यांनी स्वतःच्या किंवा कुटुंबाच्या भल्यासाठी उपोषण केले नव्हते. तर समाजासाठी,शासनाकडून समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध उपोषण केले होते.राज असरोंडकर यांचेही कुठलेही उपोषण स्वार्थासाठी नव्हते.उपोषणकर्ते सामाजिक भावनेतून उपोषण करत असताना घरच्यांचा विचार ते कधीच करत नाहीत. घरची परिस्थिती काय होईल.घरातील सदस्यांचे काय होईल.याची बिलकुल काळजी करत नाहीत.त्यांचेच काय तर त्यांना पाठिंबा देणाऱ्या संघटना,पक्ष, कार्यकर्ते, सामान्य नागरिकही त्यांच्या घरच्या सदस्यांचा विचार करत नाहीत.म्हणतात ना एखाद्या यशस्वी पुरुषामागे एक स्त्रीचा हात असतो,तसेच सामाजिक आंदोलने करणाऱ्याच्यामागे त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा पाठिंबा असतो, त्याग असतो तो आंदोलनकर्त्याच्या यशामागे झाकोळला जातो.कौतुक आंदोलनकर्त्यांचे होते, त्याला हिंमत देणाऱ्या त्याच्या घरातील कोणत्याच सदस्यांची आठवणसुद्धा येत नाही.हे वास्तव सत्य आहे.आंदोलांकर्त्यांच्या घरच्यांची सुद्धा काळजी समाजाने घ्यायला काय हरकत आहे?

**शांताराम निकम-**
**९८२२७५८६७६,उल्हास नगर,**
**(ज्येष्ट पत्रकार,माजी नगरसेवक)**

# शिदोड मध्ये उद्या पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे कीर्तन,तर रविवार १२ एप्रिल रोजी श्री हभप महंत स्वामी योगीराज महाराजांचे काल्याचे कीर्तन !

बीड (प्रतिनिधी)-श्री क्षेत्र रामगडाच्या वतीने शिदोड नगरीत सुरू असलेल्या भव्य ४७ व्या नारळी सप्ताहात उद्या दि. ९ एप्रिल २०२६ रोजी रात्री श्री ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांचे कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. तर १२ एप्रिल२०२६ रोजी श्री ह.भ.प.महंत स्वामी योगीराज महाराजांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. तरी शिदोड आणि शिदोड परिसरातील भाविकांनी या कीर्तन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे आवाहन सप्ताह आयोजक आणि समस्त शिदोड ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात येत आहे.



श्री क्षेत्र रामगडाच्या वतीने बीड तालुक्यातील शिदोड नगरीत ५ एप्रिल२०२६ पासून भव्य नारळी सप्ताहाला उत्साहात प्रारंभ झाला असून, सप्ताह दरम्यान दररोज विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या सप्ताहाला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. मंगळवार दि. ७ एप्रिल रोजी श्री ह.भ.प. इंदोरीकर महाराज यांचे कीर्तन भक्तिमय वातावरणात पार पडले. त्या नंतर दि. ८ एप्रिल २०२६ रोजी श्री ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. दि. ९ एप्रिल रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणा यांची कीर्तन सेवा होणार आहे. शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ रोजी श्री ह भ प वेदांताचार्य जयवंत महाराज बोधले यांची कीर्तन सेवा तर शनिवार ११ एप्रिल २०२६ रोजी श्री ह भ प विदर्भ रत्न संजय महाराज पाचपोर यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. रविवार दिनांक १२ एप्रिल२०२६ रोजी श्री ह. भ. प.प.पू. गुरुवर्य महंत स्वामी योगीराज महाराज मठाधिपती (श्री क्षेत्र संस्थान रामगड थोरला गड) यांचे दुपारी १२ ते ०२ या वेळेत अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर महाप्रसादाच वाटप करण्यात येणार आहे. या कीर्तनाचा व काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी शिदोड आणि शिदोड परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सप्ताह आयोजक व समस्त शिदोड ग्रामस्थांनी केले आहे.

# जागतिक आरोग्य दिनानिमित्त लातूरमध्ये स्तुत्य उपक्रम; १००० नवजात बालकांना ड्रेस वाटप, गुणवंतांचा सत्कार

लातूर,:- दि. ७ एप्रिल जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने लातूर स्त्रीरोग तज्ञ संघटना व स्त्रीरोग प्रसुतीशास्त्र विभाग, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज सामाजिक बांधिलकी जपणारा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत १००० नवजात बालकांना ड्रेस किटचे वाटप करण्यात आले, तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या इजरूड सदस्यांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला.




कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून लातूर महानगरपालिकेच्या आयुक्त मा. श्रीमती मानसी मीना (खड) उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता मा. डॉ. उदय मोहिते होते, तर निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. केशव नेटके सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी इजरूड चे नूतन अध्यक्ष डॉ. आमिर शेख व सचिव डॉ. विष्णु तारसे (२०२६–२७) यांचा गौरव करण्यात आला. तसेच खच लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत व सचिव डॉ. विश्रांत भारती (२०२६–२७) आणि थऊथ खच च्या अध्यक्षा डॉ. श्वेता काटकर व सचिव डॉ. आकांक्षा त्रिपाठी (२०२६–२७) यांचाही सत्कार करण्यात आला.

प्रमुख अतिथी श्रीमती मानसी मीना यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने राबविण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी असून 'आरोग्यासाठी एकत्र, विज्ञानासोबत उभे रहा' या घोषवाक्याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. उदय मोहिते यांनी हा नवजात बालकांसाठीचा पायोनियर उपक्रम असल्याचे नमूद करून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा मानस व्यक्त केला. उपजिल्हाधिकारी श्री. केशव नेटके यांनी इजरूड व स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र विभागाच्या या समाजोपयोगी कार्याचे विशेष कौतुक केले.

लातूर स्त्रीरोग तज्ञ संघटनेचे अध्यक्ष तथा विभागप्रमुख डॉ. भाऊराव यादव आणि सचिव डॉ. स्वप्ना निलंगेकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. डॉ स्वप्ना निलंगेकर यांनी लातूर स्त्रीरोग संघटनेच्या २०२५–२६ या वर्षातील विविध कार्यांचा आढावा सांगितला.

या कार्यक्रमास उपअधिष्ठाता डॉ. उमेश कानडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड, डॉ. गणेश बंदखडके, डॉ. अनिता पवार डॉ राजेश दरडे, डॉ मेघना गुगळे, डॉ स्नेहल देशमुख, डॉ बडे, डॉ सारिका देशमुख,डॉ स्नेहल यादव, डॉ वर्षा दरडे,यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. मुशीर शेख, डॉ. सुचिता सूर्यवंशी तसेच स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र विभागातील सर्व निवासी डॉक्टरांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमामुळे नवजात बालकांच्या कुटुंबांना दिलासा मिळाला असून, समाजात आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करण्यास मोठी मदत झाली आहे. या कार्यक्रमास सर्व आंतरवासिता डॉक्टर्स, नर्सिंग विद्यार्थी, गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर जयंती सणाच्या निमित्ताने सर्व शिक्षकांचे वेतन १० एप्रिल पर्यंत खात्यात जमा करा

बीड (प्रतिनिधी)- क्रांतिसूर्य महात्मा



ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सणाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च -२०२६ चे वेतन १० एप्रिल पर्यंत त्यांच्या खात्यात जमा करावे अशी मागणी 'बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती'च्या वतीने बीड शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सण तोंडावर आलेला असताना बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन त्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांना फुले आंबेडकर जयंती सण कसा साजरा करावा याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. या जयंती सणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिक्षकांचे मार्च -२०२६ चे वेतन जयंतीपूर्वी, म्हणजेच १० एप्रिलपर्यंत त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम यांनी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी बोलताना त्यांनी संच मान्यता आणि शिक्षक समायोजनाचा प्रश्न मार्गी लागण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदरील प्रक्रिया १० एप्रिल पर्यंत पूर्ण होईल. ही प्रक्रिया पूर्ण होताच सर्व शिक्षकांच्या खात्यावर वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. या निवेदनावर जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम खाडे, प्रा. सोनवणे, अशोक मोरे, सुभाष मोरे, अभिमन्यू बोरखेडे, शिवप्रसाद सिरसाट, प्रा. ढास आणि प्रा. मस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी उपयुक्त ठरणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई,: विविध शासकीय योजनांच्या ऑनलाईन अंमलबजावणीदरम्यान बँडविड्थची कमतरता ही मोठी अडचण ठरत होती. विशेषतः शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केल्यावर अचानक वाढणाऱ्या इंटरनेट ट्रॅफिकमुळे प्रणाली कोलमडण्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता असायची. अशा परिस्थितीत डेटा सेंटरमधील प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि तत्काळ बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री फडणवीस हस्ते वर्षा निवासस्थानी इक्विनिक्स (एंलिपळ) कंपनीच्या एमबी ३ डेटा सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे तसेच एपीएसी (झ-उ) चे अध्यक्ष सायरस अडग्रा, इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज पॉल, व्ही. पी. ग्रोथ अँड इमर्जिंग मार्केटचे मॅक्स पॅरी, आयबीएक्सचे वरिष्ठ संचालक गणेश पवार, पब्लिक पॉलिसी अँड गव्हर्नन्सच्या संचालक एलिजाबेथ हनडिंझ उपस्थित होते.

इक्विनिक्स एमबी ३ डेटा सेंटर-इक्विनिक्स ही जगातील सर्वात मोठी डेटा सेंटर आणि इंटरकनेक्शन सेवा देणारी कंपनी असून, ३६ देशांतील ७७ महानगरांमध्ये २८० डेटा सेंटर्सचे जाळे कंपनीकडे आहे. भारतातील इक्विनिक्सचे पूर्णतः स्वतःच्या मालकीचे आणि नव्याने उभारलेले एमबी ३ हे पहिले डेटा सेंटर आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३.७ एकर जागेवर उभारणी करण्यात आली असून, एकूण गुंतवणूक सुमारे ७५० दशलक्ष अमेरिकन डॉलर (सुमारे ६,००० कोटी रुपये) इतकी आहे. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर येथे ४,२०० हून अधिक कॅबिनेट्सची क्षमता उपलब्ध होणार आहे. एमबी ३ डेटा सेंटर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आधारित सेवांसाठी सक्षम आहे. तसेच, हायब्रिड मल्टी-क्लाउड इंटरकनेक्शन सुविधेद्वारे जगभरातील इक्विनिक्सच्या डेटा सेंटर्सशी तसेच ११ हजाराहून अधिक ग्राहकांशी जोडणी शक्य होणार आहे.

ऊर्जा शाश्वततेच्या दृष्टीने यवतमाळ येथे उभारण्यात आलेल्या २६.६ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पातून या डेटा सेंटरसाठी आवश्यक ऊर्जेचा मोठा भाग उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या मुंबईतील इक्विनिक्स डेटा सेंटर्समध्ये वापरल्या जाणाऱ्या उर्जेपैकी सुमारे ६० टक्के ऊर्जा या सौर प्रकल्पातून मिळते.

# लातूर येथे १० एप्रिल रोजी 'मार्जिन मनी' योजनेबाबत कार्यशाळेचे आयोजन

लातूर,: केंद्र शासनाच्या 'स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील घटकांसाठी राबविण्यात येत असलेल्या 'मार्जिन मनी' योजनेची सविस्तर माहिती देण्यासाठी लातूरमध्ये विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे औचित्य साधून ही कार्यशाळा १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयातील सभागृहात होईल.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ८ मार्च २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्जिन मनी योजना सुरू केली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ९ डिसेंबर २०२० रोजी मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यात आल्या असून, अधिक माहितीसाठी इच्छुक नागरिक शासनाच्या .ारहरीरीहीर.सीं.ळप या संकेतस्थळावर जाऊन शासन निर्णयाचे अवलोकन करू शकतात.

मार्जिन मनी योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून आपले प्रस्ताव ३० एप्रिल २०२६ पूर्वी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर येथे सादर करणे आवश्यक आहे. १० एप्रिल रोजी आयोजित या कार्यशाळेमध्ये जास्तीत जास्त इच्छुक लाभार्थ्यांनी सहभागी होऊन योजनेची माहिती घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# काळेगाव घाट येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण ज्ञानयज्ञ भागवत कथा सोहळ्याचे आयोजन.

केज/प्रतिनिधी-केज




तालुक्यातील काळेगाव घाट येथील समस्त ग्रामस्थ मंडळ व तरुण मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह, शिवपुराण कथा आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.दि.९ एप्रिल २०२६ ते १६ एप्रिल २०२६ या कालावधीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडणार असून,परिसरा तील भाविकांमध्ये भक्ती चे वातावरण निर्माण झाले आहे.कथा प्रवक्ते आणि दैनंदिन कार्यक्रम

यामध्ये सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ह.भ.प. श्री पांडुरंग महाराज शिंपले गंगाखेडकर यांच्या रसाळ वाणीतून होणारी भागवत कथा होय.दैनंदिन कार्यक्रमामध्ये पहाटे काकडआरती,विष्णू सहस्त्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण,दुपारी शिव महापुराण कथा आणि रात्री हरिपाठासह नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत.

कीर्तन महोत्सवाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे सप्ताहामध्ये दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत नामवंत महाराज मंडळींचे कीर्तन सेवा होणार आहे.

दि.९ एप्रिल२०२६ अखंड हरिनाम व भागवत कथा आयोजन निमित्त ह.भ.प.पांडुरंग महाराज शिंपले यांची क था सकाळी १० ते १२ व रात्री ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज गिरी यांचे कीर्तन होणार असून १० एप्रिल रोजी ह.भ.प.सौ.शारदाबाई गालफाडे महाराज , दिनांक ११ एप्रिल रोजी ह.भ.प.दिपक महाराज मेटे लव्हुरीकर , दिनांक १२ एप्रिल रोजी ह.भ.प.हनुमंत महाराज कोरे तांदुळवाडीकर, दिनांक १३ एप्रिल रोजी ह.भ.प. विजयकुमार पोपळे, दिनांक १४ एप्रिल रोजी ह.भ.प.तिळेकर महाराजआळंदीकर, दिनांक १५ एप्रिल रोजी ह.भ.प.सरस्तीताई स्वामी महाराज अंबाजोगाई कर, दिनांक १६ एप्रिल रोजी ह.भ.प.श्री महंत भगवान महाराज शास्त्री मठ संस्थान वरपगाव यांचे .

काल्याचे कीर्तन व महाप्रसाद सोहळ्याची सांगता गुरूवार दिनांक१६ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल.त्यानंतर उपस्थित सर्व भाविकां साठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या मंगलमय सोहळ्यासाठी नामवंत गायक,वादक आणि मृदंगमणी आपली सेवा अर्पण करणार आहेत. काळेगाव घाट आणि परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या श्रवण सुखाचा आणि महा प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सख्ख्या मामांनीच भाच्याच्या दुकानासह तीन दुकाने जाळली; केज पोलिसात गुन्हा दाखल

केज/प्रतिनिधी-केज शहरातील बीड रोडवरील




शासकीय विश्राम ग्रहाच्या जवळच असलेल्या जय भवानी मंगल सेवा मंडप व डेकोरेशन च्या दुकानाला सख्ख्या मामांनीच भाच्याच्या दुकानासह तीन दुकाने जाळल्या प्रकरणी केज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत

रोख रकमेसह एकूण १ते १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, शुभम पिंटू मोरे वय २२ वर्षे रा. महात्मा फुले नगर केज यांचे वडील पिंटू मोरे यांचे केज शहरातील शासकीय विश्रामगृहाच्या जवळ बीड रोडवर जय भवानी मंगल सेवा, मंडप व डेकोरेशन चे दुकान आहे या दुकानाच्या दोन्ही बाजूला दुकाने व एक दवाखाना आहे. सदरचे दुकाने हे शुभम मोरे व त्यांचे वडील पिंटू मोरे हे चालवत आहेत.

दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी रात्री २-३० वाजण्याच्या सुमारास शुभम मोरे व त्यांचे चुलते सोमनाथ शिवाजीराव मोरे या दोघांनी एकत्र जेवण केले व शुभम मोरे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने फुलेनगर येथील गल्लीत सजावटीचे काम मिळाल्याने लाइटिंग लावण्यासाठी ते फुलेनगर येथे गेले होते त्यांचे चुलते सोमनाथ मोरे हे दुकानात थांबले होते.

शुभम मोरे यांना पहाटे ४-३० वाजण्याच्या दरम्यान चुलते सोमनाथ मोरे यांचा फोन आला व ते शुभमला म्हणाले की, आपल्या दुकानाला तुझा मामा गोविंद किसनराव कोंबडे यांनी पेट्रोल टाकून जाळले आहे. तेव्हा शुभम मोरे हे लगेचच फुलेनगर येथून त्यांच्या दुकाने गेले तेव्हा दुकानातील सामान जळत होते. त्यावेळी शुभम व त्यांचे चुलते सोमनाथ मोरे यांनी दुकानातील आग पाण्याने विजवली.

बुधवार रोजी सकाळी शुभम मोरे यांच्या दुकानात केज पोलीस ठाण्याचे पोलीस आले होते. त्यावेळी मोरे यांच्या दुकानात ठेवलेले मंडप, डेकोरेशनचे सामान, १०० खुडच्या, ३० लाइटिंग माळा,२ लाकडी टेबल व नगदी ४० ते ५० हजार रुपयांचे जळून नुकसान झाले, तसेच शुभम मोरे यांच्या दुकानात शेजारील सम्राट कृषी दुकान मालक रघुनाथ बारगजे यांच्या दुकानातील लाईट फिटिंग, फॅन व बल्ब असे जळून अंदाजे ५ हजार रुपयाचे नुकसान झाले.त्याचबरोबर माऊली मेडिकलचे मालक यांच्या दुकानातील लाईट फिटिंग, इन्व्हर्टर, फ्रिज असे जळून अंदाजे १५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

शुभम मोरे यांच्या दुकानाच्या शेजारी असलेले चहाचे चहाप्रेमी नावाचे दुकानातील मोरे यांनी सीसीटीव्ही पाहिला असता त्यामध्ये त्यांचा मामा गोविंद किसनराव कोंबडे यांनी दुकानात पेट्रोल टाकून पेटवले व आमच्या दुकाना शेजारील दुकानाचे एकूण १ लाख ते १ लाख ५० हजार रुपयाचे नुकसान केले आहे म्हणून शुभम मोरे यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाणे येथे गोविंद कोंबडे यांच्या विरुद्ध गु. र.नं.१८७/२०२६ कलम ३२६(स) भारतीय न्याय संहिता (बी एन एस),२०२३ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल राजू वंजारे हे करत आहेत.

# विनापरवाना खाणी सुरू राहणार नाहीत याची जिल्हा प्रशासनाने दक्षता घ्यावी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई,: कोकण विभागात वैध नाही, तसेच रॉयल्टी बुडविल्याने जाणाऱ्या परवानग्यांचे एकत्रित अधिकार



कागदपत्रे असणाऱ्या खाणींबरोबरच कागदपत्रांची आणि मान्यतांची पूर्तता न करता खाणी सुरू असल्याची बाब निदर्शनास आली होती. अशा अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे कोणत्याही खाणी सुरू राहणार नाहीत, याची जिल्हा प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

यासंदर्भात विधिमंडळाच्या अधिवेशनात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर बैठक घेण्यात येईल, असे उत्तर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले होते. त्यानुसार आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार सुनील प्रभू उपस्थित होते.

ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील गौण खनिज खाणी आणि क्रशरबाबतचा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या बैठकीत आढावा घेतला. मंत्री बावनकुळे म्हणाले, खाणी बंद करणे हा शासनाचा उद्देश नाही. तथापि, त्यांच्याकडे अधिकृत कागदपत्रे आणि परवानग्या असणे आवश्यक आहे. खाणींच्या मान्यतेची प्रक्रिया ऑनलाइन उपलब्ध करुन देण्यासह खाणींमधून मान्यतेपेक्षा अधिक उत्खनन होणार शासनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेऊन खाणींना मान्यता देताना केले जाणारे उत्खनन आणि त्यासाठीची रॉयल्टी यांची सांगड घालावी. यासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने तयार केलेल्या सॉफ्टवेअरचा अभ्यास करून त्याची राज्यात सर्वत्र अंमलबजावणी करावी, असे आदेशही त्यांनी दिले.

यापूर्वी ५०० ब्रास पर्यंतच्या उत्खननाची परवानगी तहसीलदारांच्या तर दोन हजार ब्रास पर्यंतचे अधिकार उपविभागीय अधिकाऱ्यांकडे आहेत. यामध्ये रॉयल्टी वाचविण्यासाठी कमी उत्खनन दाखवून खाणींची विभागणी करून परवानगी घेण्याचे प्रकार निदर्शनास आले. यामुळे रॉयल्टीच्या माध्यमातून शासनाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी यापुढे खाणींना दिल्या जाणाऱ्या परवानग्यांचे एकत्रित अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देऊन यासंदर्भातील नियमांमध्ये बदल करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.

रायगड जिल्ह्यात पर्यावरणीय मान्यतेसाठी अर्ज केलेल्या खाणींना तात्पुरती परवानगी□रायगड जिल्ह्यात काही खाणींना पर्यावरणीय मान्यता नसल्याने जिल्हा प्रशासनाने खाण बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर उत्खनन करण्यासाठीचा उर्वरित कमी कालावधी विचारात घेऊन तात्पुरती परवानगी द्यावी, अशी विनंती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केली. याबाबत संबंधित खाण चालकांकडून पर्यावरणीय मान्यतेसाठी अर्ज केल्याचा पुरावा आणि संबंधित परवानगी तीन महिन्यात सादर करण्याचे अंडरटेकिंग घेऊन तात्पुरत्या स्वरूपात परवानगी द्यावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रायगड जिल्हाधिकारी यांना दिले.

# के. रवि (दादा) यांच्यावतीने रेमंड समूहाचे पूर्व प्रमुख मा. विजयपथ सिंघानिया यांना भावपूर्ण आदरांजली..!




सुमारे २०-२२ वर्षांपूर्वी घडलेला एक ऐतिहासिक आणि अविस्मरणीय प्रसंग आजही मनात जिवंत आहे. त्या काळात, रेमंड समूहाचे मिलेनियम एअर, सफेद रंगाचे रेमंड लेबल असलेले हेलिकॉप्टर मधुन परम पूज्य गगनगिरी महाराज यांना घेऊन गगनबावडा (कोल्हापूर) येथून खोपोली (रायगड) आश्रम आणि पुढे ठाणे शहरातील रेमंडच्याच हेलिपॅडपर्यंत एक भव्य आणि ऐतिहासिक हवाई उड्डाण करण्या मध्ये मी यशस्वी झालो, हा संपूर्ण सोहळा घडवून आणण्याचा मान मला त्यावेळी निसर्गाने दीला होता ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आयुष्यातील अविस्मरणीय आठवण आहे.

त्या क्षणांचे जिवंत छायाचित्र आणि व्हिडिओ आजही त्या दिव्य प्रसंगाची साक्ष देतात.

आज त्या महान व्यक्तिमत्त्वाला विनम्र अभिवादन करताना, त्यांच्या कार्याचा, दूरदृष्टीचा आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाचा मी सर्व देशवासीयांच्या वतीने सन्मान करतो. आणि मिलिनियम एअर रेमंड कंपनी चे मालक स्वर्गीय . विजयपथ सिंघानिया यांना आदरांजली वहातो.

विशेषता स्वर्गीय : विजयपथ सिंघानिया ज़्या क्षणि ते मुंबई चे शरीफ़ होते त्या क्षणि मी त्यांच्या कडुन व त्या पुर्वी अभिनेता , स्वर्गीयः सुनील दत्त यांच्या कडुन ही मी अनेक लोकांची अनेक प्रकारची सामाजिक कार्य मी यशस्वी रित्या करून घेतले होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.